**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा - २००५ अन्वये**
**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना**
**आढावा बैठक दिनांक २५/०६/२००७ चा कार्यवृत्तांत.**

दिनांक २५/०६/२००७ रोजी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने साप्ताहिक नियमित बैठक जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली. या बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी कर्मचा-याचे यादी सोबत जोडली आहे. या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील प्रमाणे आहे.

योजनेच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या व पुर्वघोषीत बैठकीस सुचना देऊनही उपवन संरक्षक वनविभाग, कार्यकारी अभियंता सां.बा.वि., हे अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हजर झालेले नाही ही बाब सभेच्या सुरुवातीसच निदर्शनांस आली असता याबाबत जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी तिव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. तसेच यापुढे बैठकीस नियमितपणे उपस्थित रहावे शक्यतो प्रतिनिधी पाठवु नये अपवादात्मक परिस्थितीत पुर्व परवानगीने अधिकृत प्रतिनिधी सर्व माहितीसह पाठवता येऊ शकेल हे सर्व प्रथम जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी स्पष्ट केले आणि त्या नंतर बैठकीस प्रारंभ करण्यात आला.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २००७-०८ वर्षाचा कृती आराखडा काम निहाय अनुज्ञेय मर्यादा रक्कम लक्षात घेऊन, त्या प्रमाणे वस्तुनिष्ठ आराखडा पुनश्च तयार करण्या विषयी , विशेषतः फुलंब्री, कन्नड, पैठण या गटाने ही कार्यवाही प्राधान्याने करावयाची आहे असे दिनांक ०७/०६/२००७ च्या बैठकीत आदेशित करुनही एकाही गटाने याबाबत कार्यवाही करुन अनुपालन सादर केलेले नाही ही बाब बैठकीत निदर्शनांस आलेली आहे. या वर जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी तिव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.

या अनुषंगाने , याबाबीचे अनुपालन करुन घेण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी समन्वयपुर्वक कार्यवाही करुन हे सर्व आराखडे सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांचेकडे सादर करावेत तसेच जिल्हा परिषदेची मान्यता घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावे व ही सर्व कार्यवाही तात्काळ करण्या विषयी आदेशित करण्यात आले.

मग्रारोहयो अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हयामध्ये ३१६ ग्रामपंचायती मध्ये कामाचा सेल्फ नाही असे दिनांक ०७/०६/२००७ रोजीच्या सभेत निदर्शनांत आलेले होते. या अनुषंगाने तात्काळ सेल्फ तयार करण्या विषयी जिल्हाधिकारी यांनी आदेशित केलेले होते या अनुषंगाने दिनांक २५/०६/२००७ रोजीच्या सभेत केवळ ४५ ग्रामपंचायती मध्येच असा सेल्फ नाही असे निदर्शनांस आले. या बाबीवर सर्व संबधीताने तात्काळ कार्यवाही करुन सादर केलेले अनुपालन हे निश्चितच उत्साहजनक आहे असे जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी स्पष्ट करुन यंत्रणेने उशिरा का होईना केलेल्या अनुपालना बाबत समाधान व्यक्त केले. त्याच प्रमाणे उर्वरीत ग्रामपंचायतीचा देखील सेल्फ तात्काळ करावा. असेही आदेशित केले.

ही कार्यवाही प्राधान्याने करुन येणा-या तीन महिण्या मध्ये जिल्हयातील ज्या ग्रामपंचायती मध्ये नियमित आणि जास्त प्रमाणात कामाची मागणी आहे अशा

ग्रामपंचायतीची , क्षेत्राची निवड करुन त्या ठिकाणची ग्रामपंचायत ही बाब लक्षात न घेता किमान ७० कोटी रक्कमेची कामांची अंदाजपत्रके तयार करुन जिल्हयासाठी हा सेल्फ करावा असेही नियोजन करुन कार्यवाही करण्या विषयी जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी आदेशित केले. असे करतांना वरिल प्रमाणे नियमित मजुर उपस्थिती असलेल्या ग्रामपंचायतीची किमान ४ ते ५ अंदाजपत्रके तयार करावी.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करतांना प्रशासकीय मान्यता आदेशा प्रमाणे कामे कार्यान्वीत करावयाची आहे. दिनांक १४/०३/२००७ पासुन रोहयो अंतर्गत सुधारीत करण्यात आलेल्या दरा प्रमाणे मजुरांना मजुरी अदा करावयाची आहे. त्याच प्रमाणे उपस्थित मजुरांनी केलेल्या कामांची मजुरी मजुरास विहित कालावधीत देणे बंधनकारक आहे ही बाब लक्षात घेता यंत्रणेच्या मागणी प्रमाणे काम निहाय निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. असे करतांना वास्तविक यंत्रणेनी सुधारीत दराने अंदाजपत्रके तयार करुन सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक आहे. मात्र ही कार्यवाही यंत्रणेने वारंवार आदेशित करुनही केलेली नाही त्यामुळे केवळ मजुरांचा मजुरीचा प्रश्न उदभवु नये यासाठी यंत्रणेच्या मागणी नुसार काम निहाय निधी उपलब्ध करुन देण्यात येत असुन या बाबत यंत्रणेने उचित कार्यवाही करुन सुधारीत प्रशासकीय मान्यता हस्तगत करावी अन्यथा कोणत्याही प्रकारच्या अर्थिक अनियमिततेची सर्वस्वी जबाबदारी यंत्रणेची राहील हे देखील सभागृहात स्पष्ट करण्यात आले.

त्याच प्रमाणे कामाच्या अंदाजपत्रकांना तांत्रीक मान्यता प्रदान करण्यासाठी जिल्हा स्तरावर सुधारीत मापदंड उपलब्ध नसल्यामुळे सध्या तांत्रीक मान्यता देण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. या अनुषंगाने सभागृहात चर्चा केली असता असे सुधारीत मापदंड शासनाकडुन निर्गमीत केले नसल्या बाबत निदर्शनांस आले. त्यामुळे सध्या जी अंदाजपत्रके विहीत मापदंडात बसतात केवळ त्या अंदाजपत्रकांना मान्यता दयावी व उर्वरीत अंदाजपत्रके पडताळणी करुन तसेच इतर बाबींची पुर्तता करुन ठेवावीत व शासनाकडुन सुधारीत मापदंड प्राप्त होताच त्यानुसार कार्यवाही करावी व असे सुधारीत मापदंड शासनाकडुन प्राप्त करुन घेण्यासाठी तांत्रीक विभागाने पत्र तयार करुन तसेच फॅक्स द्वारे पाठपुरावा करावा असेही सभागृहात कळविण्यात आले.

मग्रारोहयो अंतर्गत सन २००६-०७ वर्षात वितरित करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने अदा करण्यात आलेल्या हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती करुन संबधीतास दयावयाच्या आहेत. यामध्ये ग्रामपंचायत कार्यान्वयीन यंत्रणा असल्यास मुळ अदा केलेल्या हजेरीपत्रकाची झेरॉक्स प्रत करुन ही प्रत संबंधीत तहसिलदारास देण्यात यावी व या बाबतची नोंद ग्रामपंचायतीस ठेवावी. तसेच कार्यान्वयीन यंत्रणा ग्रामपंचायती व्यतिरिक्त असल्यास अदा केलेल्या हजेरीपत्रकाच्या दोन प्रती करुन एक प्रत संबधीत ग्रामपंचायतीस दयावयाची असुन दुसरी प्रत संबंधीत तहसिलदार यांना दयावयाची आहे. याबाबत वारंवार आदेश देखील दिलेले आहे. केंद्र शासनाने असे अदा केलेल्या हजेरीपत्रकाची १०० टक्के पडताळणी करण्या विषयी आदेशीत केलेले असुन ही माहिती अदयापही जिल्हा स्तरावर प्राप्त झालेली नाही. तसेच यंत्रणेने तहसिलदारास दयावयाची हजेरीपत्रके जिल्हाधिकारी कार्यालयास दयावीत व जिल्हाधिकारी कार्यालय या हजेरीपत्रकाचे ऑन लाईन नोंद करुन ही हजेरीपत्रके पुनश्च संबंधित तहसिलदार यांना परत करणार आहे. त्याच प्रमाणे अशी माहिती ऑन

लाईन सादर करतांना संबंधित कार्यालयातील कर्मचा-याने अनुषंगीक माहितीसह जसे की, काम सुरु झाल्याचा दिनांक , गट नंबर , अंदाजपत्रक, पुर्णत्वाचा दाखला ईत्यादी माहितीसह उपस्थित राहुन , जिल्हाधिकारी कार्यालयातील संबधित तालुक्यातील संगणक ऑपरेटरच्या मदतीने ही माहिती तात्काळ ऑन लाईन भरावयाची आहे. याबाबत समन्वय पुर्वक कार्यवाही करण्यासाठी अंतिम सुचना जिल्हाधिकारी यांनी दिलेले आहेत.

अशी हजेरीपत्रके तहसिल कार्यालयास दिलेली आहे असे यंत्रणेचे म्हणने आहे आणि तहसिलदार हे अशी हजेरीपत्रके यंत्रणा उपलब्ध करुन देत नाही असे निदर्शनांस आणुन देत आहे याबाबत जिल्हाधिकारी यांनी तिव्र नाराजी व्यक्त करुन या परस्पर विरोधी माहीतीच्या अनुषंगाने , यंत्रणेनेच अशी अदा केलेली हजेरीपत्रके तहसिल कार्यालयाकडुन हस्तगत करुन जिल्हास्तरावर आणुन दयावीत व जिल्हा कार्यालय ही अंदाजपत्रके माहिती सादर केल्या नंतर संबंधित तहसिलदारास परत करेल.

मग्रारोहयोची माहिती ऑन लाईन सादर करण्यासाठी तालुका स्तरावरील पंचायत समिती कार्यालयातील बाहयस्थ यंत्रणेने पुरवठा केलेले संगणक ऑपरेटर संगणकासह जिल्हाधिकारी कार्यालय येथे संबंधित तालुक्याची माहिती सादर करण्यासाठी उपलब्ध करुन देण्या विषयी दिनांक १७/०६/२००७ पर्यंत ही कार्यवाही करण्या विषयी आदेशित करुनही सोयगाव आणि सिल्लोड हे दोन गट वगळता अशी कार्यवाही झाल्याचे निदर्शनांस आलेले नाही. याबाबत जिल्हाधिकारी यांनी तिव्र नाराजी व्यक्त करुन उर्वरीत सर्व तालुक्यांनी ही कार्यवाही दिनांक २७/०६/२००७ पर्यंत करावी व यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली. त्याच प्रमाणे सिल्लोड आणि सोयगाव येथील केवळ संगणक जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात आले असुन ही दोन्ही संगणक ऑपरेटर कार्यालयात आलेली नाही याबाबत संबधीता विरुध्द कार्यवाही करण्या विषयी आदेशित करण्यात आले.

मग्रारोहयोची अंमलबजावणी करतांना सामाजीक लेखा परिक्षण मंचचे आयोजन जिल्हयामध्ये एप्रील २००७ मध्ये करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने ग्रामपंचायत निहाय कार्यवृत्तांत प्रती जिल्हाधिकारी कार्यालयास देण्या विषयी कळवुनही अशी कार्यवाही औरंगाबाद तालुका ९० ग्रामपंचायती वगळता कोणीही केलेली नाही ही निश्चितच खेदजनक बाब आहे असे जिल्हाधिकारी यांनी सभागृहात सांगितले व यासाठी दिनांक ३०/०६/२००७ ही अंतिम दिनांक देण्यात आलेली आहे व याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली.

मग्रारोहयोची अंमलबजावणी बैठक दिनांक ०७/०६/२००७ रोजी ठरल्या प्रमाणे योजने अंतर्गत उर्वरीत मजुर कुटूंबीयांनी छायाचित्रे काढुन घेण्यासाठी पुर्वघोषीत नियोजन देण्या विषयी कळविलेले असुनही फुलंब्री गटाने दिनांक २७/०६/२००७ रोजी सादर केलेली माहिती वगळता एकाही गटाने असे नियोजन दिलेले नाही. सामाजिक लेखा परिक्षणाच्या अनुषंगाने प्रत्येक गटाने किमान दोन ग्रामपंचायती विषयी माहिती कळविण्याचे आदेशित करुनही खुलताबाद आणि फुलंब्री वगळता ही माहिती अप्राप्त आहे, ग्रामरोजगार सेवकाची विहीत नमुन्यातील माहिती एकाही गटाने सादर केलेली नाही. मग्रारोहयो अंतर्गत नाव नोंदणी केलेल्या कुटूंबीयांची नोंदणी करण्यासाठी दिलेले नमुना नं. १ नाव नोंदणी अर्ज अक्षरा कॉम्प्युटर्स, औरंगाबाद येथे पडुन आहेत

व हे अर्ज पावसामुळे खराब होऊ शकतात त्यामुळे हे अर्ज दिनांक ०७/०६/२००७ रोजीच्या बैठक संपल्या नंतर घेऊन जाण्या विषयी आदेशित करुनही ही कार्यवाही देखील एकाही गटाने केलेली नाही.

या व यासारख्या ब-याच बाबींवर तात्काळ अनुपालन सादर करणे अनिवार्य असतांना देखील गटा कडुन या बाबत अत्यंत उदासिनता निदर्शनांस आलेली आहे. त्यामुळे सर्व प्रलंबीत मुदया बाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी मुद्ये निहाय गटा कडुन माहिती घेऊन संकलीत अनुपालन दिनांक ३०/०६/२००७ पुर्वी करावे असेही ठरविण्यात आले.

मग्रारोहयो अंतर्गत सन २००६-०७ वर्षात वितरित निधीच्या अनुषंगाने गटा कडुन अदयापही उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. यासाठी दिनांक ५/७/२००७ ही अंतिम दिनांक देण्यात आलेली आहे. असे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक ०१/०४/२००६ ते ३१/०३/२००७ आणि ०१/०४/२००७ ते ३०/०६/२००७ असा कालावधी ठरवुन देण्यात आलेला आहे.

मग्रारोहयोच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने या पुढेही दर सोमवारी संध्याकाळी ५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे नियमितपणे आढावा बैठक होणार आहे. या बैठकीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अति. मु.का.अ. , उप मु.का.अ. , कार्यकारी अभियंता (पापु / बांध/ सिंचन) जिल्हा परिषद, कृषी अधिकारी, जि.प. , प्रकल्प संचालक, जिग्रावियं, इतर कार्यान्वयीन यंत्रणेचे जिल्हास्तरावरील प्रमुख , डी आय ओ एनआयसी औरंगाबाद , बाहयस्थ मनुष्यबळ पुरविणा-या यंत्रणेचे अध्यक्ष यांनी न चुकता वेळेवर परिपूर्ण माहितीसह उपस्थित रहावयाचे आहे. दर सोमवारी होणा-या अशा बैठकीस पहिला तिसरा आणि पाचवा सोमवार या बैठकीस वरिल सर्व यंत्रणेने उपस्थित रहावयाचे आहे आणि दुसरा आणि चौथा सोमवार या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अति. मु.का.अ. , उप मु.का.अ. , कार्यकारी अभियंता (पापु / बांध/ सिंचन) जिल्हा परिषद, कृषी अधिकारी, जि.प. , प्रकल्प संचालक, जिग्रावियं यांनी उपस्थित रहावयाचे आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी पुन्हा एकदा सर्वांच्या निदर्शनांस आणुन दिले.

यानंतर जिल्हाधिकारी यांनी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन करुन जिल्हयामध्ये याची परिणामकारक प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्व उपस्थितांस आवाहन करुन , यंत्रणेच्या अडी अडचणी आहे किंवा कसे या बाबत आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानुन सर्व संम्मतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सोबत :- उपस्थितांची यादी.**

जिल्हा कार्यक्रम समन्वयक,
मग्रारोहयो तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

प्रतिलीपी :-

१. मा. ग्रामीण रोजगार हमी आयुक्त, मग्रारोहयो तथा विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
२. सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मग्रारोहयो तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद.

proci

३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
४. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना माहिती व अनुपालनास्तव.
५. ------------------------------------------ सर्व यंत्रणा प्रमुख जिल्हा औरंगाबाद
६. डी आय ओ एनआयसी, औरंगाबाद यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
७. उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद, वैजापुर, सिल्लोड यांना माहितीस्तव.
८. कार्यक्रम अधिकारी, मग्रारोहयो तथा तहसिलदार -------------------- सर्व यांना माहितीस्तव.
९. सह गट कार्यक्रम अधिकारी, मग्रारोहयो तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ------------------------------ सर्व यांना माहितीस्तव.
१०. अध्यक्ष, राजमाता जिजाऊ बहुउददेशिय संस्था जालना, यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
११. संचालक, सिनर्जीज सोलुशन, औरंगाबाद यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
१२. निवड नस्ती.

O/C Signed by Hon. D.P.C. M.R.E.G.S. & Collector Aurangabad.

जिल्हा कार्यक्रम समन्वयक,
मग्रारोहयो तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

proci

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा - २००५ अन्वये**
**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना**
**आढावा बैठक दिनांक २५/०६/२००७ रोजीच्या बैठकीस**
**उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांची यादी.**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव | पदनांम |
|---|---|---|
| १ | श्री संजीव जयस्वाल | जिल्हा कार्यक्रम समन्वयक मग्रारोहयो तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद. |
| २ | श्री विजय वाघमारे | सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक मग्रारोहयो तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद |
| ३ | श्रीमती रिता मेत्रेवार | उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मग्रारोहयो तथा उपजिल्हाधिकारी रोहयो, औरंगाबाद. |
| ४ | श्री व्ही.व्ही.गुजर | अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. औरंगाबाद |
| ५ | श्री डी.आर.फुलारे | कृषी विकास अधिकारी, जि.प. औरंगाबाद |
| ६ | श्री आर.पी. फुलंब्रीकर | कार्यकारी अभियंता (सिंचन) जि.प. औरंगाबाद |
| ७ | श्री एस.सी.व्यास | कृषी अधिकारी, जि.प.औरंगाबाद |
| ८ | श्री टी.एस. ढगे | सहाय्यक प्रकल्प अधिकारी, जिग्रावियं औरंगाबाद |
| ९ | श्री ओ.टी. गायकवाड | शाखा अभियंता (सिं.) जि.प. औरंगाबाद |
| १० | श्री एस.के.दिवेकर | उप संचालक कृषी जि.अ.कृ.अ. औरंगाबाद |
| ११ | श्री सागावे एस.पी. | प्र.अ. जि.अ.कृ.अ. औरंगाबाद |
| १२ | श्री डॉ. बी.डी.दळवी | उप मु.का.अ. (पंचायत) जि.प. औरंगाबाद |
| १३ | श्री करुरकर जी.एस. | शाखा अभियंता लपास्थर औरंगाबाद |
| १४ | श्री जे.एस.शेरे | उपसंचालक सावित्रि औरंगाबाद |
| १५ | श्री व्ही.ओ. सोनवणे | सहा.संचालक सावित्रि औरंगाबाद |
| १६ | श्री एस.एम.कदम | कार्यकारी अभियंता पापु जि.प. औरंगाबाद |
| १७ | श्री ए.वाय. गुंजाळे | कार्यकारी अभियंता बांधकाम जि.प. औरंगाबाद |
| १८ | श्री व्ही.जी.बोडखे | कार्यकारी अभियंता सांबावि पश्चिम |
| १९ | श्री पी.के.पाटील | कार्यकारी अभियंता सांबावि औरंगाबाद |
| २० | श्री के.बी.गायकवाड | उप कार्यकारी अभियंता सांबावि औरंगाबाद |
| २१ | श्री एस.आर.मालपाणी | कनिष्ठ अभियंता मग्रारोहयो, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद |
| २२ | श्री एस.बी.वासुंदेकर | ग्रामसेवक मग्रारोहयो, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद |
| २३ | तसेच यंत्रणेचे प्रमुख सोबत उपस्थित कर्मचारीवृंद | |

proci